पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **२६/०५/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२६/०५/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.मंगला अशोक कदम
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
८. मा.अॅड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.कदम – प्रशासन अधिकारी, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.०१) यमुनानगर जलतरण तलावाचे पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्तीबाबत.

विषय क्र.०२) हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय व श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय नविन पुस्तक खरेदीचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

विषय क्र.०३) छत्रपती शाहु व्यायामशाळा, प्रेमलोक पार्क ही व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०४) मनपाचे जलतरण तलाव, लॉन टेनिस कोर्ट, बॅडमिंटन हॉल ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास देणेबाबत – मा.राजेंद्र गावडे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०५) तानाजी गावडे व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.०६) संत तुकारामनगरमधील संत तुकाराम महाराज पुतळयामागील व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर मिळणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

-----------

दिनांक १२/०५/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २६/०५/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३३५/२०१७, दि.२०/०५/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/३२१/२०१७, दि.१५/०५/२०१७ अन्वये मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड १९ यांना यमुनानगर जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज, त्यांनी, यापूर्वी केलेल्या करारनाम्या प्रमाणे, पुन्हा करारनामा करून पहिल्या वर्षाचे मंजूर दराने दरमहा र.रु.९७,०२०/- या दराने दिनांक ०९/०४/२०१६ ते दिनांक ०८/०४/२०१७ या १ वर्षे कालावधीचे कामाचे आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २६/०५/२०१७
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.सचिन भोसले
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/२/कावि/५९५/२०१७, दिनांक – २५/०५/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय व श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय या दोन्ही वाचनालयांना महाराष्ट्र शासनाचा “ ब ” दर्जा प्राप्त असून त्यांना शासनाचे अनुदान मिळते. शासनाचे अनुदान मिळणेकरिता सदर सार्वजनिक वाचनालयाकरिता पुस्तक खरेदी करणेकामी सार्वजनिक वाचनालयाकडील कोटेशन क्र.२ जा.क्र.सावा/१/कावि/५/२०१७, दिनांक – ०६/०१/२०१७ अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविणेत आले होते. त्यामध्ये प्राप्त झालेल्या सेल्फ हेल्प पब्लिकेशन यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय व श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालयाकरिता पुस्तकाचे छापिल किंमतीवर २३% सुट देवून अंदाजे र.रु.१,५५,०००/- (अक्षरी

र.रु.एक लाख पंचावन्न हजार फक्त) ची पुस्तके खरेदीचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २६/०५/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मनपाची छत्रपती शाहु व्यायामशाळा, प्रेमलोक पार्क ही व्यायामशाळा चंद्रकांत मित्र मंडळ, दळवीनगर या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २६/०५/२०१७

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.राजेंद्र गावडे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

मनपाचे जलतरण तलाव, लॉन टेनिस कोर्ट, बॅडमिंटन हॉल, ५ वर्षे भाडेकराराने चालविण्यास देणेस व याकामी भाडे दर निश्चित करण्याचे अधिकार मा.अतिरिक्त आयुक्त / मा.सहा. आयुक्त, यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २६/०५/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची " तानाजी गावडे " व्यायामशाळा, प्रभाग क्र.१८ ही सरदास गावडे प्रतिष्ठान या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २६/०५/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

संत तुकारामनगर येथील संत तुकाराम महाराज पुतळया मागील महानगरपालिकेची व्यायामशाळा हनुमान स्पोर्टस् ॲकेडमी, हनुमान हेल्थ क्लब, मोरे वस्ती, साई मंदिरामागे चिखली पुणे ४१२ ४११ रजिस्टर नं.महाराष्ट्र १९६१ / २०११ पुणे यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८३४/२०१७
दिनांक : ३०/०५/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc